दिनांक:- ११/०८/२०१७
चंदननगर पो.स्टे. पुणे शहर

## प्रेस नोट

## खुनाचे प्रयत्न करणारे तीन आरोपींना लागलीच अटक करुन गुन्हा उघडकीस आणलेबाबत

चंदननगर पोलीस स्टेशन गु. र. नं. १८९/२०१७, भा. द. वि. कलम ३०७, ३४ मधील फिर्यादी सुर्यप्रकाश चंद्रप्रकाश सतनामी, वय ३२ वर्षे, धंदा- सिक्युरीटी गार्ड, रा. हिरामन पैलवान यांचे पञ्याचे खोलीत बॅरेकेट च्या जवळ, राजमुद्रा हॉटेल चे मागे, तुळजा भवानी नगर, खराडी पुणे. मुळगाव- बासबेडा, तहसील- मिसामेरी, जि. सोनिनपुर, राज्य आसाम. यांनी फिर्यादी दिली की, दि. १०/८/२०१७ रोजी सायं. ०७.१५ वा. चे पुर्वी बेरील सोसायटी जवळील, पुणे मनपा चे मोकळे जागेत खराडी, पुणे येथे फिर्यादी यांचा मेव्हना ओमप्रकाश सतनामी वय ३२ वर्षे, यास पैशाचे देवान घेवानचे कारणावरुन आरोपी नामे १) गिरेंद्र सतनामी, २) प्रकाश सतनामी व ३) सागर सकीया यांनी दारु पिवुन व मेव्हन्यास दारु पाजुन त्यास जिवे मारण्याचे हेतुने डोक्यात मोठ्या दगडाने मारुन गंभीर दुखापत करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

सदरचे आरोपी नामे १) गिरेंद्र सतनामी, २) प्रकाश सतनामी व ३) सागर सकीया हे मुळ राहणार आसाम येथील असुन ते गावी पळुन जाणार असलेबाबत पो. ना. १७२८ दिपक चव्हाण यांना माहिती मिळाली असता मा. श्री. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, पुणे व मा. श्री. वंसत तांबे, सहायक पो. आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोउनि घाग, पोउनि रजपुत, पोउनि साळुंखे, पो. ना. १७२८ चव्हाण, पो.हवा. ११५२ शेख, पो.हवा. १५५ पाटील, पो.ना. १६८३ गायकवाड, पो.ना. २३३१ कुरुकिल्ली, पो.ना. ५८३१ सोनवणे या पथकाने लागलीच सापळा रचुन त्यांना ताब्यात घेवुन दि.११/०८/२०१७ रोजी ०१/०० वा. अटक करुन तात्काळ गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कारवाई श्री. शशिकांत शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त सो, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे शहर, मा. श्री. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, परि. ४, मा. श्री. वंसत तांबे, सहायक पो. आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे व श्री राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चंदननगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सत्यवान पाटील, पोलीस निरीक्षक, गुन्हे हे करीत आहेत.